मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमध्ये 5 लाख मतदार वाढले!

## नवमतदारांमुळे मतदारसंख्येत भर: युवा मतदार ठरविणार भावी नगरसेवक!

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिकेच्या निवडणुकीकरिता प्रारूप प्रभाग रचना अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाला सादर केली आहे. महापालिका निवडणुकीसाठी २०१७ मध्ये ११ लाख ९२ हजार ८९ मतदारसंख्या होती. आठ वर्षात ५ लाख १६ हजार ६९८ मतदार वाढले आहेत. शहरातील लोकसंख्येत झालेली वाढ आणि नवमतदारांमुळे मतदारसंख्येत भर पडल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठीप्रभागरचना अंतिम करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीसाठी शासनाने माहिती मागविली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीची तारीख दिवाळीनंतर निश्चित होणार असल्याचे स्पष्ट आहे. निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती घेऊन सुनावणी पार पडली आहे. आता प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठवण्यात आली असून ६ ऑक्टोबरपर्यंत अंतिम स्वरूप मिळणार आहे. त्यानंतर निवडणुकीसाठी अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे.

**कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मतदार याद्या [ पिंपरी-चिंचवड ]**

राज्य निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा कार्यक्रम अद्याप आलेला नाही. मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पालिका निवडणूक विभागाकडून प्रभागनिहाय मतदार यादीचे काम करण्यात येणार आहे.विधानसभेची मतदार यादी फोडून २ १ ते ३२ अशी प्रभागात विभागली जाईल. त्या ३२ मतदार याद्या पालिकेकडून उपलब्ध करण्यात येतील. एका प्रभागात मतदार संख्या ४५ ३ ते ५५ हजार असणार आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांना कसरत होणार आहे.

**२०११ च्या जनगणने-नुसार**

फेब्रुवारी २०१४ आणि फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत २०११ ची लोकसंख्या ग्राह्य धरण्यात आली होती. आताच्या निवडणुकीसाठीही २०११ च्या जनगणनेनुसार प्रभागरचना करण्यात आली आहे. आताची मतदारसंख्या लक्षात घेऊन मतदारयादी तयार करण्यात येईल.

> “ निवडणूक आयोगाकडून विधानसभानिहाय मतदारयादी मागविण्यात आली आहे. मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर प्रभाग निहाय मतदार याद्या फोडण्यात येतील. मात्र, मतदार यादी कोणत्या तारखेपर्यंत ग्राह्य धरायची, याबाबत सूचना निवडणूक आयोगाकडून आल्या नाहीत.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### पिंपरी-चिंचवड शहराची विधानसभानिहाय मतदारसंख्या

- पिंपरी – ३,९९,८००
- चिंचवड- ६,७९,८५८
- भोसरी- ६,२९,१२९

# पिंपरी चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा भव्य देखावा

## कीर्तीताई मारुती जाधव युथ फाउंडेशन आणि श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान यांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनीधी**

कीर्तीताई मारुती जाधव युथ फाउंडेशन आणि श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने, पिंपरी चिंचवड शहरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा भव्य देखावा साकारण्यात आला आहे.

यावाबत माहिती देताना जाधव म्हणाल्या नवरात्रोत्सव हा एक अत्यंत पवित्र व्रत आहे, ज्यामध्ये देवीच्या विविध प्रतिमांचे दर्शन घडते आणि भक्तीभाव जागृत होतो. भारतातील सर्व शक्तिपीठांमध्ये महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे विशेष स्थान आहे. याच शक्ती रूपाचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न यंदा आम्ही केला आहे.

साडेतीन शक्तिपीठांमध्ये समावेश असलेल्या कोल्हापूरच्या अंबाबाई, तुळजापूरच्या तुळजाभवानी माता, माहूरच्या श्री रेणुकादेवी आणि सप्तश्रृंगी माता यांचा भव्य देखावा पिंपरी चिंचवडमध्ये पाहायला मिळेल. हे शक्तिपीठ भक्तांना अतिशय आकर्षक व भव्यपणे सादर केले गेले आहेत, जे नवरात्रोत्सवाच्या रंगात आणखी भर टाकतात.



संयोजिका जाधव यांनी सर्व देवी भक्तांना आव्हान केले आहे की, ते या देखाव्याचे दर्शन घ्यावेत आणि नवरात्रोत्सवाच्या आध्यात्मिक अनुभवाचा लाभ घ्यावा.

# पक्क्या रस्त्यासाठी वाहतूक वळविण्याची मागणी

## मेट्रोचे काम सुरू असल्याने भक्ती-शक्ती ते चिंचवड स्टेशनपर्यंतच्या सेवा रस्त्यावर मोठे खड्डे



**पिंपरी | प्रतिनिधी**

मेट्रोचे काम सुरू असल्याने निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प ते चिंचवड स्टेशनपर्यंतच्या सेवा रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. नागरिकांचा रोष वाढल्यानंतर महामेट्रोने सेवा रस्ता पक्का करून देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, पक्का रस्ता करण्यासाठी काही दिवस या मार्गावरील वाहतूक बंद करून इतरत्र वळविण्याची मागणी महामेट्रोने महापालिका व वाहतूक पोलिसांकडे केली आहे. वाहतूक वळवून रस्ता मोकळा करून देताच पक्का रस्ता तयार केला जाईल, असे पुणे महामेट्रो प्रशासनाने सांगितले.

पिंपरी ते निगडी मेट्रो विस्तारित मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवडच्या एम्पायर इस्टेटपर्यंतचा सेवा रस्ता आणि बीआरटी मार्ग महापालिकेने महामेट्रोकडे हस्तांतरित केला आहे. हे अंतर ४.५ किलोमीटर इतके आहे. या रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महामेट्रोकडे देण्यात आली आहे. सध्या भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवड स्टेशनपर्यंत मेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्ता, बीआरटी मार्ग खोदून खांबाची उभारणी, ‘व्हायाडक्ट’चे काम सुरू आहे. विनाअडथळा काम करता यावे, यासाठी महामेट्रोने या मार्गावर सुरक्षा कठडे (बॅरिकेड) लावले आहेत. त्यामुळे सेवा रस्ता प्रचंड अरुंद झाला आहे. पदपथ उखडून तेथे रस्ता करण्यात आला आहे.

अरुंद रस्ता, त्यात वाहनांची मोठी वर्दळ आणि पावसामुळे पडलेले खड्डे यामुळे वाहतूक संथ होऊन कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागतात. दहा मिनिटांच्या अंतरासाठी अर्धा तासापेक्षा अधिक वेळ लागतो. खड्डयांबाबत सामाजिक संघटना, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवकांनी वारंवार तक्रार करूनही त्याची दखल घेतली जात नव्हती. खड्डेदुरुस्तीबाबत महापालिकेने महामेट्रोला तीन वेळा पत्र पाठविले. मात्र, महामेट्रोकडून त्याची दखल घेतली जात नसल्याने खड्डेमय रस्त्यांवरूनच वाहतूक सुरू आहे. आता, या मार्गावरील वाहतूक काही दिवसांसाठी बंद केल्यास रस्ते पक्के करून देऊ, असा प्रस्ताव महामेट्रोने दिला आहे.

> निगडी ते चिंचवड स्टेशन मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्ते दुरुस्त केल्यानंतरही पावसामुळे वारंवार खड्डे पडत आहेत. या मार्गावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने वळवून काही दिवस बंद करावी. त्यानंतर हा रस्ता पक्का केला जाईल.
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

> महामेट्रो व्यवस्थापनाने रस्तेदुरुस्तीचा कालावधी कळवावा. वाहतूक पोलिसांशी समन्वय साधावा. निगडी ते चिंचवड स्टेशन मार्गावरील वाहतूक बंद करण्यासाठी महापालिका प्रशासन पूर्ण सहकार्य करील.
> **- बापूसाहेब गायकवाड,सहशहर अभियंता, दळणवळण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# भक्ती शक्ती चौकात दोन हजारांहून अधिक नागरिकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

## शहर स्वच्छ ठेवण्याचा केला संकल्प; स्वच्छता मोहिमेत 12 टन कचरा गोळा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या “श्रमदान एक दिवस – एक तास – एक साथ” या उपक्रमाने निगडीतील भक्ती शक्ती चौकात स्वच्छतेचा महाउत्सव आज नागरिकांनी अनुभवला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात “स्वच्छतेची शपथ” घेत दोन हजारांहून अधिक नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. भक्ती शक्ती चौकातून ट्रान्सपोर्ट नगरी चौक, देहूरोड चौक, अंकुश चौक, पिंपरी चौक, आकुर्डी चौक याठिकाणी जाणाऱ्या रस्त्यांवर स्वच्छता मोहिम राबवत जवळपास १२ टन कचरा गोळा करण्यात आला. आमदार उमा खापरे आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ झाला.

याप्रसंगी महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त सचिन पवार, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अतुल पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, महेश आढाव, शांताराम माने, तानाजी दाते, कुंडलिक दरवडे, अंकुश झिटे,राजेश भाट, सुधीर वाघमारे, माजी नगरसदस्य सचिन चिखले, नारायण बहिरवाडे, त्रिपुरा राज्यातील आगरतळा महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अमित कर्माकर, सहाय्यक लेखाधिकारी बलई चंद्रदास, उप प्रकल्प समन्वय अधिकारी सुरोजित दास, वित्त व्यवस्थापन अधिकारी पवन पारीक, सामाजिक संरक्षक अधिकारी रेखा दुबे यांच्यासह रुपीनगर ज्येष्ठ नागरिक संघ, महेंद्र लॉजिस्टिक्स अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अमृता विद्यालय, मॉडर्न कॉलेज, सायरस पुनावाला स्कूल, शिशुविहार विद्यालय, प्रा.रामकृष्ण मोरे विद्यालय, पीसीईटी कॉलेज अशा विविध शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले की, स्वच्छता सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहराने राज्यात प्रथम तर देशात सातवा क्रमांक मिळवला आहे. यामध्ये खऱ्या अर्थाने योगदान हे आपल्या सफाई मित्रांचे आहे. शहरामध्ये दैनंदिन स्वच्छता राहावी, यासाठी महापालिकेचे सफाई कर्मचारी अहोरात्र कार्यरत असतात. आता स्वच्छता सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये आपल्याला देशात अग्रेसर यायचे आहे. त्या अनुषंगाने महापालिका विविध उपक्रम राबवत असून नागरिक देखील या उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. आज “श्रमदान एक दिवस – एक तास – एक साथ” या उपक्रमाला शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून आपले पिंपरी चिंचवड देशात स्वच्छतेच्या बाबतीत अग्रेसर येण्यासाठी नागरिकांचे असेच सहकार्य भविष्यातही कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# निवडणुकीसाठी महापालिकेकडून 23 विशेष कक्ष

## नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कामाला सुरुवात करावी; आयुक्त नवल किशोर राम

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी महापालिकेच्या निवडणुकीची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली आहे. यासाठी २३ विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली असून या कक्षांसाठी संबंधित अधिकारी नेमण्यात आले आहेत. नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कामाला सुरुवात करावी, असे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रभाग रचनांबाबत आलेल्या हरकती आणि सूचनांवर सुनावणी पूर्ण झाली आहे. सुनावणी घेऊन याबाबतचा अहवाल सनदी अधिकारी व्ही. राधा यांनी नगरविकास विभागाकडे सादर केला आहे. पुढील महिन्यात प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर होणार आहे.



महापालिकेची आगामी निवडणूक जानेवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. प्रभाग रचना ६ ऑक्टोबर पूर्वी अंतिम होऊन त्यानंतर प्रभागांचे आरक्षण निश्चित होणार आहेत. निवडणुकीसाठी सर्वच पक्षात इच्छुकांची तयारी सुरू झाली आहे. निवडणुकीसाठी राजकीय घडामोडींना वेग आलेला असताना आता महापालिका प्रशासनाने देखील तयारी सुरू केली आहे.

निवडणुकीच्या कामासाठी २४ हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार आहे. त्यापैकी सुमारे १९ हजार कर्मचारी उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच २३ कक्ष स्थापन केले आहेत. प्रत्येक कक्ष प्रमुखांना त्यांच्या कामकाजाचा अहवाल थेट महापालिका आयुक्तांना सादर करावा लागणार आहे.

निवडणुकीसाठी महापालिकेच्या पातळीवर हे कक्ष सुरू करण्यात आले असून त्यासाठी प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे कोणत्याही कक्ष प्रमुखांनी निवडणूक आयोग अथवा राज्य सरकारशी थेट संपर्क साधू नये. काही अडचणी अथवा प्रश्न असतील तर निवडणूक विभागाचे उपायुक्त यांच्याशी संपर्क साधावा अशा सूचना या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. निवडणूक कार्यक्रम पूर्ण होऊन निकाल लागेपर्यंत ही जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहणार आहे.

### असे आहेत कक्ष

» निवडणूक कर्मचारी व व्यवस्थापन, टपाली मतपत्रिका व्यवस्थापन, थकबाकी ना हरकत प्रमाणपत्र, मतदान केंद्र व सोयीसुविधा, मतदान व मतमोजणी, स्टेशनरी व साहित्य वितरण, माहिती व जनसंपर्क, दूरसंचार सुविधा, बैठकांचे आयोजन, आचारसंहिता पालन, विद्रूपीकरण कारवाई, पेड न्यूज तपासणी, वाहतूक व्यवस्थापन, सभा-मंडप परवानगी, विद्युत व्यवस्थापन, माहिती व तंत्रज्ञान, ईव्हीएम व्यवस्थापन, समन्वय, निवडणूक खर्च तपासणी, विधी, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा व्यवस्थापन असे कक्ष सुरू करण्यात आले आहेत.

# एसटीची नवरात्रीनिमित्त 'साडेतीन शक्तिपीठ'साठी विशेष बस सेवा!

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पिंपरी चिंचवड आगारातून विशेष बस सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

भाविकांना नवरात्रीत देवीच्या शक्तीपीठांचे दर्शन करता यावे, या करिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पिंपरी चिंचवड आगारातून विशेष बस सुविधा देण्यात येत आहे. नवरात्रौत्सवानिमित्त साडेतीन शक्तीपीठांचे दर्शनासाठी एसटी बस उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी महामंडळाच्या संकेतस्थळावर आरक्षण देखील सुरू झाले आहे. राज्य शासनाच्या महिला सन्मान योजने अंतर्गत या बससाठी देखील महिलांना तिकीट भाड्यात ५० टक्क्यांची सवलत मिळणार आहे.

हिंदू धर्मात शारदीय नवरात्राला विशेष महत्त्व आहे. हा सण देवी शक्तीच्या उपासनेचा काळ मानला जातो. यंदा शारदीय नवरात्र सोमवार, २२ सप्टेंबरपासून सुरू झाली असून १ ऑक्टोबरला संपणार आहे.



नवरात्रीत मोठ्या संख्येने भाविक महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांच्या दर्शनासाठी जातात. यामुळे भाविकांच्या सुविधेसाठी एसटी महामंडळाच्या पुणे विभागाकडून विशेष बस सोडण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड येथून २७ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजता बस साडेतीन शक्तीपीठासाठी रवाना होईल.

पिंपरी चिंचवड, शिवाजीनगर, स्वारगेट, कात्रज, कोल्हापूर, सोलापूर, तुळजापूर, माहूरगड, सप्तश्रृंगीमार्गे पुन्हा पिंपरी चिंचवड ही बस सोडण्यात येणार आहे. या बससाठी तीन हजार १०१ रुपये भाडे असणार असून, तुळजापूर, माहूरगड आणि सप्तश्रृंगीगड येथे मुक्काम असणार आहे. मुक्कामाच्या ठिकाणी राहणे, जेवण आणि इतर खर्च स्वतः प्रवाशांना करावा लागणार आहे. यात तुळजापूर आणि माहुरगड असे दोन दिवस मुक्काम असणार आहे, या सेवेचा लाभ जास्तीत जात नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन एसटीच्या पुणे विभागाकडून करण्यात आले आहे.

**जिल्ह्यातील शक्ती स्थळासाठी पीएमपीची सेवा**

नवरात्रोत्सव निमित्ताने पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) जिल्ह्यातील शक्तिस्थळांसाठी विशेष बस सोडणार आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्ह्यात देवींची अनेक जागृत आणि प्राचीन मंदिरे आहेत. तेथे नऊ दिवसांत हजारो भाविक दर्शनासाठी जातात. त्यांच्या सोईसाठी दोन मार्गांची आखणी करण्यात आली आहे. प्रवाशांचा प्रवास आरामदायी व सुलभ होण्यासाठी वातानुकूलित ई-बस असतील. शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी तसेच इतर दिवशी नागरिकांच्या मागणीनुसार ही बससेवा उपलब्ध असणार आहे.

### मावळातील मंदिरांकडे दुर्लक्ष

» पिंपरी चिंचवड शहर आणि मावळात देवींची अनेक प्राचीन आणि जागृत मंदिरे आहेत. तेथेही शेकडो भाविक जातात. यातील अनेक मंदिरांकडे पीएमपीएमएलचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. दापोडीतील फिरंगाई देवी, कुंदन नगर शेलारवाडीतील अमरजाई देवी, शेलारवाडी तील अमरजाई देवी, यमुनानगर मधील सातेरी देवी, आकुर्डीतील तुळजाभवानी, निगडीतील दुर्गादेवी, कार्ल्याची एकवीरा देवी, तळेगाव दाभाडेतील चौराई देवी आणि इंदोरीतील कडजाई माता देवी याठिकाणीही बस सोडण्याची मागणी भाविकांनी केली आहे.

### असे आहेत मार्ग

» क्र. १ : पुणे स्टेशन – स्वारगेट – तळजाई माता मंदिर (तळजाई) – पद्मावती – तुकाई माता (कोंढणपूर) – श्रीनाथ म्हस्कोबा जोगेश्वरी (कोडीत) – यमाई (शिवरी) – स्वारगेट – पुणे स्टेशन.

» क्र. २ : पुणे स्टेशन – स्वारगेट – महालक्ष्मी (सारसबाग) – तांबडी जोगेश्वरी – चतुःश्रृंगी – वैष्णवी (पिंपरी कॅम्प) – भवानी माता – स्वारगेट – पुणे स्टेशन.

# पुरंदर विमानतळासाठी आजपासून प्रत्यक्ष मोजणी

## पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी या गावांमधून जमीन संपादित होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी संमतिपत्रे देण्याची मुदत, गुरुवारी (२५ सप्टेंबर) संपणार असल्याने शुक्रवारपासून (२६ सप्टेंबर) विमानतळासाठीच्या प्रत्यक्ष जमीनमोजणीस सुरुवात होणार आहे. त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, आतापर्यंत ९५ टक्के शेतकऱ्यांनी संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाकडे दिली आहेत.

पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे सरकारने साडेसातऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. त्यानुसार सहमती संमतिपत्रे देण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. या कालावधीत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिली. त्यानंतर संमतिपत्रे देण्यासाठी गुरुवारपर्यंत (२५ सप्टेंबर) मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार आतापर्यंत ९५ टक्के शेतकऱ्यांनी विमानतळासाठी जागा देण्याची तयारी दर्शविली असून, संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत.

विमानतळासाठी सुमारे तीन हजार एकर जमीन घेण्याचे नियोजन आहे. मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे २०० एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे भूसंपादित जमिनीसह विमानतळासाठी सुमारे २९०० एकर जमीन उपलब्ध होणार आहे.



दरम्यान, संमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर 'एरोसिटी'त एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी विमानतळाच्या परिसरात सुमारे ७०० एकर जागा राखीव ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार विमानतळासाठी सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंड आणि बाजारभावाच्या चौपट दराने मोबदला देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

> “ संमतिपत्रे देण्याची मुदत संपुष्टात आल्यानंतर शुक्रवारपासून प्रत्यक्ष जमीनमोजणीस सुरुवात करण्यात येणार आहे. २० ऑक्टोबरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
>
> **- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, पुणे.**

# ससून रुग्णालयातील मनोरुग्णाचा 11व्या मजल्यावरून आत्महत्या

## ससून रुग्णालयातील सुरक्षितता आणि मानसिक आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील ससून रुग्णालयातील मनोरुग्ण विभागात आज सकाळी एक धक्कादायक घटना घडली. विजय नावाचा रुग्ण रुग्णालयाच्या 11व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. या घटनेने रुग्णालयातील सुरक्षितता आणि मानसिक आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

माहितीप्रमाणे, विजय याला यापूर्वी 5 सप्टेंबर रोजी रेल्वे पोलिसांनी ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. त्यापूर्वीही विजयने रेल्वेसमोर आत्महत्येचा प्रयत्न केला होता, ज्यात पोलिसांनी त्याला सुरक्षित रुग्णालयात दाखल केले. या घटनांमुळे रुग्णालयातील प्रशासनावर रुग्णांच्या देखरेखीच्या पद्धतींवर प्रश्न निर्माण झाले आहेत.

ससून रुग्णालय हे पुण्यातील एक मोठे आणि प्रसिद्ध वैद्यकीय केंद्र असून, अनेकदा माध्यमांतर्गत त्याच्या उपचार पद्धतींबाबत चर्चा होत असते. गेल्या काही महिन्यांपासून उपचारांमध्ये तडफड किंवा रुग्णांच्या मृत्यूची धक्कादायक माहिती समोर येत आहे, आणि विजयच्या आत्महत्येनंतर ही चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

विजयच्या आत्महत्येनंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. रुग्णालय प्रशासन आणि पोलीस दोघेही या घटनेचे कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मनोरुग्णांच्या देखरेखीची पद्धत, रुग्णालयातील सुरक्षा उपाय, तसेच मानसिक आरोग्याची काळजी घेण्याच्या पद्धती या सर्व बाबी आता चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत.



विजयवर रुग्णालयात उपचार सुरू असताना ही घटना घडल्याने, मनोरुग्णांसाठी रुग्णालयातील सुरक्षितता आणि उपचार व्यवस्थेवर तातडीने सुधारणा करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. या प्रकाराच्या पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.